महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेस प्रवेश
सर्टिफिकेट कोर्सेस प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ऑटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ६१ वा | मंगळवार, दि. २३ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सोलापूर जिल्ह्यात पावसाचे थैमान..!

## शेतातील पीकं पडली आडवी; शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रूंच्या धारा

## गावात पाणी, घरात पाणी, ओढ्यांना पूर नागरिकांची उडाली तारांबळ










**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात पावसाने हाहाकार केला आहे. माढा आणि करमाळा तालुक्याला पावसाने झोडपून काढले असून नदी-नाल्यांना पूर आला आहे. सीना नदीला आलेल्या पूरामुळे २६ गावांना फटका बसला आहे. दोन्ही तालुक्यातील १,८०० ग्रामस्थ पुरामध्ये अडकले होते. या सर्वांचे स्थलांतर करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात येत आहे. करमाळा तालुक्यातील १० गावांचा देखील संपर्क तुटला आहे. संभाव्य पूरस्थितीबाबत प्रशासन ॲक्शन मोडवर आहे. तर करमाळ्याच्या तहसीलदार शिल्पा ठोकडे यांनी हातात काठी घेऊनच परिस्थितीत धोकादायक वाहतूक करू पाहणाऱ्या नागरिकांना परतवून लावले आहे.

अहिल्यानगर आणि बीड जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसाने सीना, कोळेगाव धरण क्षमतेपेक्षा अधिक भरल्याने ५२ हजार क्यूसेक वेगाने सीना नदीपात्रात पाणी सोडले आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील माढा आणि करमाळा तालुक्यातील २६ गावांना पुराचा फटका बसला आहे. करमाळा तालुक्यातील ६५० ग्रामस्थांना स्थलांतर सुरू केले आहे. माढा तालुक्यातील १,२०० ग्रामस्थांचे देखील स्थलांतर करण्यात येत आहे. आज संध्याकाळनंतर करमाळा आणि माढा तालुक्यातील पूरस्थिती गंभीर होणार आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आणि काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून केले जात आहे.

सोलापुरातील सीना नदीला आलेल्या महापुरामुळे नदीचे पाणी गावात शिरायला सुरुवात झाली आहे. मोहोळ तालुक्यातील साबळेवाडी गावात नदीपात्रापासून १ किलोमीटर अंतरावर शेतात पाणी घुसले आहे. त्यामुळे सोयाबीन, तुर, कांदा, ऊस पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. २ लाख क्यूसेक वेगाने सीना नदीत पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे सीना नदीला महापूर आला आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा, मोहोळ, दक्षिण सोलापूर तालुक्यातील गावात पूरस्थिती निर्माण झाली आहे.

सोलापुरातील बार्शी तालुक्याला कालरात्री मुसळधार पावसाने झोडपून काढले. बार्शी तालुक्यातील चांदणी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. चांदणी नदीला पूर आल्याने गावाकडे जाणारे पूल पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे आगळगाव, मांडेगाव, खडकलगाव, धस पिंपळगाव, देवगाव आणि कांदलगाव या गावांचा संपर्क तुटला आहे. या पावसामुळे उडीद, कांदा, सोयाबिन आदी पिकाचे प्रचंड नुकसान झाले आहे.

अक्कलकोट तालुक्यातील जेऊर गावात सायंकाळी ढगफुटीसदृश पाऊस झाला. या मुसळधार पावसामुळे ओढ्यांना पूर आला आणि पाण्याचे लोंढे थेट गावात शिरले. गावातील वेशीपर्यंत गुडघाभर पाणी साचले होते, तर धनगर गल्लीतील अनेक घरांमध्ये पाणी घुसल्याने लोकांची तारांबळ उडाली.

यामुळे नागरिकांना तात्पुरता निवारा म्हणून काशिविश्वेश्वर मंदिरात आश्रय घ्यावा लागला. फरशी ओढ्यावरून पाणी वाहत असल्यामुळे जेऊर ते अक्कलकोट आणि स्टेशनकडे जाणारे दोन्ही रस्ते बंद झाले आहेत, ज्यामुळे वाहतूक पूर्णपणे थांबली आहे. या जोरदार पावसामुळे परिसरातील ओढे आणि नाले तुडुंब भरून वाहत आहेत.

यामुळे केळी, ऊस, तूर, सोयाबीन आणि सूर्यफूल यांसारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. माढा तालुक्यातील वडशिंगे येथे पुराच्या पाण्यात वाहून जाणाऱ्या पाच जणांना ग्रामस्थांनी बाहेर काढून वाचवले. माढा तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात रविवारी रात्रीच्या पावसाने थैमान घातले. बार्शी ते तुळजापूर राज्यमार्गावर झाड पडल्याने मार्ग वाहतुकीसाठी रात्री बंद झाला. (पान 2 वर..)


विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला


## बोरी नदीला पूर: अनेक गावांचा संपर्क तुटला



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यातील बोरी नदीला आलेल्या पुरामुळे चिंचोळी (मैं.) ते रूध्देवाडी या मुख्य रस्त्याचा संपर्क पुन्हा तुटला आहे. सतत १० ते १५ वेळा बंद होणाऱ्या या मागार्मुळे परिसरातील नागरिक, विशेषतः कर्नाटक सीमेजवळील जेवर्गी (ब.) गावातील ग्रामस्थ अडचणीत सापडले आहेत.

पूराच्या पाण्यामुळे जेवर्गी (ब.) गावाचा कर्नाटकमधील अफझलपूर तालुक्याशी असलेला कच्चा रस्ताही पूर्णतः बंद झाला असून, त्यामुळे रुग्णवाहतूक, बाजारासाठी जाणे आणि इतर अत्यावश्यक सेवा पूर्णपणे ठप्प झाल्या आहेत. पर्यायी मार्गच उपलब्ध नसल्याने येथील नागरिकांना अत्यंत गंभीर परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे.

बोरी नदीकाठावरील गावांमध्ये दरवर्षी पिकांमध्ये पाणी शिरते, मात्र यंदा शेतीच्या जमिनी खरडून जाण्याचे प्रमाण अधिक आहे. त्यामुळे पिकांचे आणि जमीन दोन्हीचे मोठे नुकसान झाले आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ श्री. परमेश्वर पाटील यांनी प्रशासनाकडे दुधनीला जाणाऱ्या रस्त्याचे त्वरित डांबरीकरण करणे आणि चिंचोळी (मैं.) ते जुना मुगळी रस्ता उभारण्याची मागणी केली आहे.

या वेळी विजयकुमार आंदेवाडी, श्रीमंत पाटील, रमेश बिराजदार, राजशेखर कलबंडी, गोपाल आंदेवाडी, नागू जमादार, महानिंग सोनकांबळे, बंदगी चिद्री, ग्रामसुरक्षा दल सदस्य आणि अन्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे नुकसानभरपाईची मागणी करत तातडीने उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे.

## माझ्या शेतकरी भावा...



तुला जगलेच पाहिजे माझ्या भावा
तुझ्या लेकरासाठी
तुझ्या म्हाताऱ्या आईबापासाठी
आणि तुझ्या खांद्याला खांदा लावून राबणाऱ्या कारभारणीसाठी...
हे अगदीच मान्य आहे की असे सल्ले देणे नक्कीच सोपे असते...
परःदुख शीतल असते... तरीही सांगावेसे वाटतात चार शब्द..
पिकाचा चिखल बघताना, नांगरणीच्या दिवसापासून सगळे घामेजलेले दिवस तुला आठवत असतील..
उधारीवर घेतलेले बियाणे खते आणि औषधे... देणेकऱ्यांना दिलेले शब्द..
प्रकाशाकडे झेपावणारे बियाणाला फुटलेले अंकुर..अंधार करील दूर अशी आशा...
अंकुर जागवता जागवता, बघता बघता सारे संपले...
माती सुद्धा जिथं वाहून गेली, तिथं आता कुठून सुरुवात करायची? या तुझ्या प्रश्नाचे उत्तर माझ्याकडे नाही..
ज्या मातीत जन्म झाला, ज्या मातीवर मोठा झाला ती मातीच शेतातून साथ सोडून गेल्यावर त्या उरलेल्या खडकावर डोके आपटायचं का?
हे सारं सारं मनात येईल...
पण तरीही तुला जगावं लागेल... मातीमोल झालेलं पीक, शेतातली गेलेली माती आणि जगण्याचा आलेला चिखल
यातून उभे राहावे लागेल माझ्या भावा...
तू जर हताश होऊन निघून गेला तर त्या मागच्या माणसांनी कुणाकडे बघायचं मला सांग...?
मान्य आहे,
व्यवस्थेच्या या गर्दीतही तू एकटा आहेस... तुझ्या शेतावर फिरणारे चॅनेलचे कॅमेरे लगेच पुन्हा नेत्यांची एकमेकातील भांडणे दाखवायला पुन्हा मुंबईत सरकलीत...
तुझ्या दुःखाला टीआरपी नाही मित्रा..
टीआरपीसाठी एक पडळकर तुझ्या दुःखाला भारी आहे..तू बांधावर रडत बसताना, चिखलात लोळताना मुंबईत आय फोन खरेदीसाठी चेंगराचेंगरी होते आहे... ही विसंगती हाच व्यवस्थेचा खरा चेहरा आहे.
तुला नुकसान भरपाई का मिळत नाही हे विचारण्यापेक्षा मध्यप्रदेशात एका बाईला दोन पाणीपुरी कमी मिळाल्या हे रिल शेअर करण्यात आम्हाला गंमत वाटतेय... या मानसिकतेतील अंतराला शरद जोशी भारत इंडिया म्हणत होते...
विचार करण्याचे इंद्रिय मेंदू नसून खिसा आहे असे त्यामुळेच ते बोलत होते...
शेतकऱ्यावर काहीच आमचे अवलंबून नाही..त्याच्या आनंदावर आमचे सुख अवलंबून नाही आणि त्याच्या रडण्याने आमचे काहीही बिघडत नाही..अशी मानसिकता तयार झालेला बांडगुळी वर्ग हीच आजची समस्या आहे... त्याच्या डिजे वर नाचण्याचा आवाजात तुमच्या किंकाळ्या व्यवस्थे पर्यंत जाणारच नाहीत... मिरवणुकीत लावलेल्या लाईटच्या प्रकाशझोतात तुझ्या आयुष्यातला अंधार पोहोचणार नाही मित्रा...
ट्रम्प त्यांच्या आयुष्यावर परिणाम करू शकतो पण तुझ्या दुःखाने त्यांच्या आयुष्यावर ओरखडाही उमटणार नाही हा त्यांचा आत्मविश्वास तुझ्या दुःखाला अधिकच गहिरे करणारा आहे..तुला कर्जमाफी दिल्यावर आमच्या टॅक्स मधून का देता हा प्रश्न विचारणारा आणि कर्ज बुडवून पळालेल्या वेळी गप्प राहणारा हाच वर्ग आहे..या बोलक्या वर्गाचे मौन तुझ्या दुःखाचा सन्नाटा अधिकच गहिरा करत आहे भावा...
पण जेव्हा सावरशील तेव्हा बांधावर उभा राहून व्यवस्थेला प्रश्न विचारावे लागतील... आज सारे एकटे पडलेत त्यामुळे प्रत्येक संकट हवालदिल करून टाकतेङ्गएकेकाळी महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या संघटना होत्या.. तेव्हा कितीही संकट आली तरी आपण एकटे नाही ही भावना सुद्धा त्या संकटातून तरुन नेत
होती... शेतकऱ्यांना चक्काजाम केला की सरकारे जाम होत होती आज आपण संघटित नाही, विखुरलेले आहोत..त्यातून एकटेपण अधिक गहिरं होत आहे...
निसर्गाशी लढणं कठीण आहे पण सरकार आणि या लुटीच्या व्यवस्थेशी नक्कीच लढता येईल...
आपल्या हक्काचा वाटा सरकारकडे मागता येईल.. ट्रिलियन डॉलर मध्ये वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेचा प्रवाह जर मेट्रो आणि महामार्ग बांधायला आणि शेअर मार्केट फुलण्याकडे जाणार असेल... शरद जोशींच्या शब्दात भारताचे रक्त शोषून इंडिया कडेच जाणार असेल तर तो प्रवाह त्या प्रवाहात उतरून तो प्रवाह उलटा फिरवावा लागेल... आपल्याच पोटची पोर गोडी गुलाबी करून व्यवस्थेचे दलाल होऊन आपल्याला व्यवस्थेच्या दावणीला बांधत असते तर तो कावा ओळखून त्यांनाही झटकावे लागेल आणि त्या व्यवस्थेचा हिशोब बांधून मांडावा लागेल मित्रा... त्यासाठी भांडावा लागेल मित्रा.
तेव्हा पंचनामे करा आणि हेक्टरी मदत करा , इथेच न थांबता माझ्या शेतातून या व्यवस्थेने नेलेल्या रुपया रुपयाच्या हिशोब या व्यवस्थेला मागाव लागेल मित्रा...
एक पाऊस जर संपूर्ण संसाराची धूळधाण उडवत असेल तर या व्यवस्थेत एका दाण्याचे शंभर दाणे करून सुद्धा आपल्या पदरात काय पडलं याचा सुद्धा हिशोब मांडायची हीच वेळ आहे ...इतकी केविलवाणी अवस्था का झाली आमची?...
पाऊस वर्षभर सारखा पडत राहणार, पावसाने साथ दिली तर बाजार भाव पाडत राहणार.. कधी ओला दुष्काळ कधी कोरडा दुष्काळ.. पडणारा पाऊस आणि पडणारे भाव यातून सुटका होणार की नाही...?
तेव्हा उठ आता
डोळे पूस
भांबावलेल्या लेकरांच्या डोक्यावरून हात फिरवून शेतात चल...
आणि जेव्हा सावरशील, तेव्हा आता संघटित व्हायचा निर्धार कर
पुन्हा एकदा महाराष्ट्रात सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन त्यांचा आवाज बुलंद केला तर अर्थव्यवस्थेचा इंडियाकडे गेलेला प्रवाह पुन्हा खेड्याकडे वाहू लागेल..
तुझ्या संघटित शक्तीला टीआरपी असेल,
माध्यम सुद्धा पुन्हा बांधा बांधावर फिरू लागतील../ शेतकऱ्याच्या संघटित शक्तीला ओलांडून कोणालाच जाता येणार नाही..
शेताचे पंचनामे जरूर झाले पाहिजेत.. पण व्यवस्थेचा पंचनामा करून पुन्हा एकदा राजकारणाच्या चिखलात संघटनाची पेरणी करावी लागेल..
आंदोलनांचे खत टाकावे लागेल त्यातून फुलून येणारे पीक हेच अंतिम उत्तर असेल, व्यवस्थेला झुकवणारे...

**- हेरंब कुलकर्णी,** 8208589195







## संपादकीय

# डिजिटल कितपत सुरक्षित?

गेल्या काही दिवसांत ॲप्समध्ये दडलेले डिजिटल जग उघड केल्याची प्रकरणे घडली आहेत. डिजिटल जगावर डोळे झाकून विश्वास ठेवला जातो आणि त्यास सर्वस्व अर्पण करतो. परिणामी डिजिटल जगात असणारी प्रत्येक वस्तू ही एखाद्या लॉकरप्रमाणे सुरक्षित राहते साठी विचार करण्याची चूक कशी झाली? हा खरा प्रश्न आहे.

मानवाच्या बुद्धीचा विकास कालानुरूप झाला असून तो डिजिटल जगाच्या तुलनेत अतिशय वेगळ्या पद्धतीने म्हणजे वास्तवावर आधारित झाला आहे. तरीही गेल्या काही दशकांपासून, प्रामुख्याने पंधरा वर्षांपासून इंटरनेट, सोशल मीडिया आणि एआयसारख्या तंत्रज्ञानाच्या प्रगतीने मानवाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम झाला आहे. आपल्या संवादात, ज्ञान मिळवण्यात आणि जगासमोर प्रकट होण्याच्या पद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणला. यानुसार आपण डिजिटल युगाच्या आहारी गेलो आणि तेच आपले जग असल्याचे मानू लागलो. फिर्थ जे फ्रोम आणि त्यांच्या साथीदारांनी अभ्यास अहवाल 'फ्रॉम ऑनलाइन ब्रेन्स टू ऑनलाइन लाइव्हस अंडरस्टँडिंग द इंडिविजुअलाइज्ड इम्पॅक्ट ऑफ इंटरनेट युज अक्रॉस इंडिव्हिज्युअल्ड इम्पॅक्टस ऑफ इंटरनेट अक्रॉस सायकॉलॉजाईड कॉग्निटिव्ह अँड सोशल डिमेन्सन्स' मध्ये म्हटल्यानुसार तंत्रज्ञानाच्या प्रचंड वेगामुळे मेंदूतील वास्तवाला धरून असलेली विकासाभिमुख रचना आणि आधुनिक डिजिटल संस्कृतीकडे वाढता ओढा यात ताळमेळ बसवताना तारांबळ उडताना दिसते.

2019 मध्ये 'सायकियाट्रियत' प्रकाशित फिर्थ यांचा अभ्यास अहवाल 'द ऑनलाइन ब्रेन : हाऊ द इंटरनेट' यात त्यांनी 'बी चेंजिंग ऑर कॉग्निशन' लेखात मानवी मेंदूची संरचना आणि डिजिटल आक्रमण यात सविस्तर चर्चा करण्यात आली आहे. यात म्हटल्यानुसार, आपल्या मेंदूवर एक वास्तविक विकासवादी इतिहासाची छाप असून त्याची सजीवता ही नैसर्गिक वातावरणातील सजगता आणि सुक्ष्म घडामोडींच्या सामाजिक गतीशीलतेवर अवलंबून आहे. मेंदूची रचना आणि त्याची कार्यप्रणाली ही प्रत्यक्षात काळानुसार प्रस्थापित होणारे सामाजिक संबंध, मौलिक माहिती आणि तत्कालिन काळातील भौतिक स्थितीनुसार विकसित झाली आहे. आजच्याप्रमाणे ऑनलाइन माहितीच्या आधारे बुद्धीचा विकास झालेला नाही. अर्थात मेंदू असामान्य रुपाने लवचिक नाही. देहाने आणि कोहेन यांनी 'कल्चरल रिसायकलिंग ऑफ कॉर्टिकल मॅप्सः हाऊ रीडिंग अँड मॅथमॅटिक्स रिशेप ह्युमन कॉर्टिक्स, न्यूरॉन' मध्ये मेंदूच्या अशा प्रकारच्या विकासाच्या स्थितीला बायोलॉजिकल अबस्ट्रॅट असे म्हटले आहे. (जैविक अडथळा) आपण मानवी जीवनातील डिजिटल घडामोडींचा विचार करतो तेव्हा हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. इंटरनेट, सोशल मीडिया आणि एआयने गेल्या काही दशकांपासून क्रांती घडवलेली असून तो मोठा अविष्कार मानला जातो. तंत्रज्ञानाच्या अभूतपूर्व गतीने मानवी मेंदू आणि त्यास अनुसरून क्षमता विकसित करण्याचे एक गंभीर आव्हान निर्माण झाले आहे. कारण यात सांस्कृतिक आणि रचनात्मक मार्गाने नाट्यमय बदल होत असताना विकासाभिमुख प्रक्रियेबरोबर ताळमेळ बसविण्यासाठी मेंदूला पुरेसा कालावधी दिला नाही. ज्या गतीने ही उपकरणे मानवी जीवनात सामावली गेली, तेथे मेंदूची विकासात्मक रचना आणि आधुनिक डिजिटल जग याच्यात ताळमेळ बसताना गोंधळ निर्माण होऊ लागला. म्हणून मेंदूची नैसर्गिक गोष्टी आत्मसात करण्याची क्षमता या वेगाने होर्णाया बदलाशी ताळमेळ मिळवू शकते का? आणि त्यात सामावले जात असताना गुंतागुंत निर्माण होईल का?

डिजिटल आणि वास्तविक जग यात फरक असल्याचे मेंदूच्या रचनात्मक स्थितीला जमवून घ्यावे लागणार आहे. म्हणजे एकीकडे वास्तविक जग मान्य करत असताना आभासी जग हा केवळ दिखावा आहे, हे त्याला पटवून घ्यावे लागणार आहे. जेव्हा डिजिटल जवळीकतेचा मुद्दा येतो तेव्हा आतापर्यंतची सामाजिक व्यवस्था पाहिली तर त्याकडे एक फसवे जग म्हणूनच पाहिले गेले आणि कधी कधी तिरस्काराच्या नजरेतूनही बघितले गेले आहे. विशेष म्हणजे याच जगाला आपण सुरक्षित जग म्हणून समजू लागलो आणि तेथेच सर्वस्व अर्पण करू लागलो. पण आभासी जगात सुरक्षेची हमी कोणीच देत नाही. शेवटी या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी मेंदूच्या रचनात्मक पद्धतीत बदल करणे गरजेचे आहे. अर्थात ही दीर्घकाळ प्रक्रिया असली तरी त्याची सुरुवात करणे तितकेच आवश्यक आहे. मानवी मेंदूने डिजिटल जगाचे वास्तव ओळखायला शिकले पाहिजे आणि जगासमोर येणारे आभासी जग हे मानवी बुद्धिमत्तेतून नाही तर मेंदूतील रचनात्मक बदलाच्या प्रक्रियेचा भाग आहे, हे ओळखले पाहिजे. हाच बदल डिजिटल जगात सुरक्षा देण्याचे काम करेल आणि डिजिटल जगात असलेले विश्व हे एखाद्या कुलुपबंद खोलीप्रमाणे सुरक्षित नसून त्याकडे हजारो डोळ्याचे लक्ष असल्याचे मान्य करेल.

सध्याचा समाज अनामिक संघषार्तून जात असून तेथे डिजिटल जगाचे अस्तित्व नाकारले जाणार नाही. परंतु त्याचे वर्तमान काळातील रूप देखील मान्य केले जाणार नाही. प्रामुख्याने जेव्हा डिजिटल जगाशी असलेल्या संबंधाचा मुद्दा येतो तेव्हा आहे तसे स्वरूप मानले जाणार नाही. कारण त्यामुळे मनात निर्माण होणारी असुरक्षितता ही एखाद्या शारीरिक वेदनेप्रमाणेच क्लेषदायी आणि वेदनादायी आहे.

सध्याची प्रचलित कायदा आणि सुव्यवस्था वास्तवातील जगात मानसिक आणि शारीरिक हानी पोचवर्णायांना दंड देत असेल तरी तो अद्याप डिजिटल जगातील मानसिक त्रासाला कायद्याच्या चौकटीत घेणारा नाही. त्यामुळे डिजिटल जगाकडून होणारा छळ हा शारीरिक छळापेक्षा कमी नाही, हे मान्य करावे लागेल. त्यामुळे सध्याच्या काळात सामाजिक आराखड्याचा भाग म्हणून डिजिटल व्यवस्था समोर येत असेल तर त्यानुसार कायदेशीर व्यवस्था विकसित करणे गरजेचे असून ती काळाची गरज बनली आहे.

# प्रत्येक क्षेत्रात विकतचे पुरस्कार घेणाऱ्यांचा सुळसुळाट

हल्ली प्रत्येकाच्या मोबाईलवर फेसबुकच्या माध्यमातून आपल्याला काही खऱ्या तर काही खोट्या बातम्या तसेच जाहिराती किंवा विविध प्रकारची मार्केटिंग करणारे बॅनर वाचायला मिळतात. मग ते राजकीय क्षेत्राचे असो, धार्मिक क्षेत्राचे असो, शैक्षणिक क्षेत्राचे असो किंवा सांस्कृतिक क्षेत्राचे असो, या प्रत्येक क्षेत्राशी निगडित पुरस्कार देणाऱ्या विविध सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक संघटना किंवा विविध संस्था विविध पुरस्कार वितरणाचे बॅनर सोशल मीडियावर फिरवत आहेत. वेगवेगळ्या पद्धतीचे म्हणजेच साहित्यरत्न पुरस्कार, समाज भूषण पुरस्कार, भारत भूषण पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार किंवा समाजरत्न पुरस्कार आम्ही देत आहोत म्हणून या संघटना बॅनरखाली आपला फोन नंबर देऊन मेसेजच्या माध्यमातून आपले सामाजिक कार्य व आपण कोणत्या क्षेत्रात कोणते कार्य करत आहोत, यासाठी माहिती व फोटो पाठवा, आम्ही तुम्हाला तुमच्या वैयक्तिक क्षेत्राशी निगडित कायार्ची दखल घेऊन पुरस्कार देऊ असे सांगत आहेत. आणि लगेच दोन दिवसांनी मेसेज करत आहेत की आम्ही तुमच्या कायार्ची दखल घेऊन तुम्ही पुरस्कारासाठी दखलपात्र आहात त्यासाठी तुम्हाला एवढी एवढी रक्कम आम्हाला पाठवावी लागेल, तेव्हा तुमची नोंद होईल आणि मग तुम्हाला पुरस्काराबाबत अधिक माहिती दिली जाईल असे सांगून पैसे उकळण्याचा धंदा विविध सामाजिक संघटना व धार्मिक संघटना करताना दिसत असल्याचे चित्र आपण सध्या पाहत आहोत. ज्यांना पुरस्काराची हाव आहे, ज्यांना पुरस्कार घेऊन मिरवायची सवय आहे, जे पुरस्कारासाठी हपापलेले असतात आणि ज्यांना विविध प्रकारचे पुरस्कार गोळा करायची सवय असते, ते लोक त्या संस्थांना व संघटनांना म्हणेल तेवढे पैसे देऊन पुरस्कारासाठी पात्र होत आहेत आणि पुरस्कार मिळवत आहेत. असे खोटे व विकतचे पुरस्कार घेऊन मिरवणाऱ्यांची संख्या आता प्रत्येक क्षेत्रात प्रचंड वाढली आहे. आणि असे नापात्र व विकतचे पुरस्कार घेऊन लगेच बॅनरबाजी, पेपरबाजी आणि टीव्ही व सोशल मीडियावर पुरस्कार प्राप्त झाला म्हणून बातम्या देणाऱ्यांचा सुळसुळाट आता प्रत्येक क्षेत्रात वाढला आहे. असे विकतचे व नापात्र पुरस्कार घेऊन मिरवण्यात काय अर्थ? विकतचे पुरस्कार घेऊन स्वतःचे नाव कधीच मोठे होत नसते तर उलट आपल्याला कमी समजून आपल्या पश्चात आपला अपमान केला जातो. ज्यांचे कार्य आपल्या क्षेत्रात खरोखरच उल्लेखनीय नाही, ज्यांचे आपल्या क्षेत्रात योगदान योग्य व उचित नाही, ज्यांचे समाजासाठी व देशासाठी सामाजिक कार्य शून्य आहे, जे आपल्या नेमून दिलेल्या कायार्शी व पेशाशी एकनिष्ठ नसतात, आपल्या कार्यात म्हणावे तेवढे सक्रिय नसतात, तेच महाभाग असे विकतचे पुरस्कार घेऊन स्वतःच्या हाताने आपले नाव मोठे करण्याचा प्रयत्न करतात. पण हे खरंच कसे शक्य होईल हो? लोक तुमच्या नापात्र पुरस्काराची वाहवा कशी करतील हो? लोक तुम्हाला त्या क्षेत्रातील आदर्श व मौल्यवान हिरा समजतील का हो? समाज सुद्धा खूप हुशार व सुजाण असतो. त्याला प्रत्येक क्षेत्रातील प्रत्येक व्यक्तीशी निगडित लहान सहान गोष्टी माहित असतात. त्यांचे त्यांच्या क्षेत्रातील सामाजिक कार्य व एकनिष्ठपणा माहीत असतो. आपल्या कार्याशी किती एकनिष्ठ आहात आणि आपल्या कार्याशी किती प्रामाणिक आहात? हे लोकांना सांगायची गरज नाही. गावकरी व समाज बांधव तेव्हाच ओळखतात की, हा व्यक्ती पुरस्काराच्या लायकीचा व योग्यतेचा आहे का? याचे सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात खरंच उल्लेखनीय कार्य आहे का? याला भेटलेला पुरस्कार खरंच दखलपात्र आहे का? का तो हा विकतचा पुरस्कार घेऊन उगाच मिरवत आहे? या प्रत्येक गोष्टीची जाण आणि भान समाजाला असते. म्हणून विकतचे पुरस्कार घेऊन लोकांना वेड्यात काढण्याचा धंदा बंद करा...आपल्याला खरंच दखलपात्र व सामाजिक कायार्ची दखल घेऊन विविध सामाजिक संघटनांतर्फे किंवा एखाद्या संस्थेतर्फे किंवा जिल्हा परिषदेच्या माध्यमातून पुरस्कार दिला जातो तेव्हा त्या पुरस्काराचा आनंद खरोखरच अवर्णनीय असतो. समाज बांधव गावकरी व विविध क्षेत्रातील लोक तुमच्या दखलपात्र पुरस्काराची वाहवा करतील. तुमचे बॅनर व पोस्टर चौका चौकात लावतील. पेपरबाजी व सोशल मीडियावर तुमच्या नावाचा गवगवा करतील. फक्त त्यासाठी आपले काम प्रामाणिक, एकनिष्ठ व समाजाच्या आणि देशाच्या भल्यासाठी असले पाहिजे. तरच तुम्हाला मिळालेल्या पुरस्काराची किंमत असेल. नाहीतर विकतचे पुरस्कार आजकाल कोणीही घेऊन आपल्या नावाचा स्वतःच्या हाताने डंका वाजवत आहे. हे आपल्याला सांगायची गरज नाही. सामाजिक कायार्ची दखल घेणारे लोक प्रचंड प्रमाणात आहेत. ते तुमच्या कायार्ची दखल घेऊन जर तुमचे कार्य खरोखरच उल्लेखनीय व प्रशंसनीय असेल तर तुम्हाला पुरस्कार देतीलच. तुम्हाला कोणत्या राजकीय लोकांकडे किंवा प्रशासकीय अधिकाऱ्याकडे पुरस्कार द्या म्हणून त्यांच्या पाया पडायची किंवा त्यांचे पाय धरायची गरज पडणार नाही. एवढे मी खात्रीने सांगू शकतो. मी सुद्धा साहित्यिक व लेखक आहे. मला सुद्धा साहित्य क्षेत्रातील पुरस्कार देण्यासाठी एका संघटनेने माझ्या लेखांचे फोटो मागितले होते. मी ते फोटो त्यांना मोठ्या अपेक्षेने व खुशीने पाठवले. आणि त्यांनी मला सांगितले की तुम्हाला दोन दिवसात कळवतो की, तुमची पुरस्कारासाठी निवड होईल किंवा नाही? बरोबर दोन दिवसांनी त्यांनी मला मेसेज केला आणि सांगितले की तुमची पुरस्कारासाठी निवड झाली आहे त्यासाठी तुम्हाला पाच हजार रुपये मानधन आमच्या संस्थेला द्यावे लागेल...मी लगेच माझे गुरुवर्य व सुप्रसिद्ध लेखक कवी तथा कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक बबनराव गुळवे गुरुजी यांना ही हकीकत सांगितली. तेव्हा त्यांनी मला सांगितले की, हे बघ बुद्धभूषण असले विकतचे पुरस्कार न घेतलेलेच बरे..अशा अनेक संघटना आहेत जे की विकत पुरस्कार देऊन सन्मान करतात...अशा विकतच्या पुरस्काराला काय अर्थ? हे मला गुळवे सरांनी सांगितले आणि मी तो विकतचा पुरस्कार न घेण्याचे ठरवले. गुळवे सर म्हणतात की, आपण आपल्या क्षेत्रात व पेशात आपले काम प्रामाणिकपणे व इमानेइतबारे करत राहायचे.... आपल्या कायार्तून सुगंध दरवळत ठेवायचा... तो सुगंध आपोआप सर्व दूर पसरतो आणि आपल्या नावाचा बोलबाला आपोआप होतो. आपल्याला पुरस्कार मागायची किंवा द्या म्हणायची गरज पडणार नाही आपल्या कायार्ची दखल घेऊन आपल्याला पुरस्कार देणाऱ्या प्रामाणिक व इमानदार आणि निस्वार्थ सामाजिक संघटना व संस्था भरपूर आहेत...त्या आपल्याला पुरस्कार नक्कीच देतील...मला सुद्धा माझ्या सामाजिक कायार्ची दखल घेऊन एकही रुपया न देता मला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत... त्यासाठी प्रत्येक क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना, शासकीय अधिकाऱ्यांना, शिक्षकांना व इतर क्षेत्रातील कार्यकर्त्यांना विनंती आहे की, माझ्या मोठ्या बांधवांनो, विकतचे पुरस्कार घेण्याच्या फंदात पडू नका आणि आपले नाव खराब करून घेऊ नका... प्रामाणिकपणे व तन-मन-धनाने आपले कार्य करत राहा नक्कीच आपल्या कायार्ची दखल घेऊन आपल्याला योग्य व दखलपात्र पुरस्कार मिळेल... एवढे मात्र नक्की...

**– बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर
मो.7498715661

## प्रबोधन

# आरोग्याचे महत्व!

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम। असं एक संस्कृत सुवचन प्रसिद्ध आहे. अर्थात, जीवन जगण्यासाठी माणसाचं शरीर धडधाकट, निरोगी असलं पाहिजे. शरीर जर रोगांचं माहेरघर होऊन बसलं तर माणूस आपलं कोणतंही काम – अर्थात, धर्माचरण करू शकणार नाही.

पण शंभरातील १०-२० माणसंच निरोगी असतात. म्हाताऱ्यांच्या मानाने तरुण थोडे अधिक निरोगी असतात, हे खरं आहे. पण सुखवस्तू प्रकारातील स्त्रिया आणि साठ वर्षांच्या पुढची प्रजा अनेक व्याधींनी ग्रासलेली असते. अनियमित आणि अनियंत्रित खाणं-पिणं, शारीरिक कामाचा कंटाळा, इंद्रिय (लैंगिक) सुखांचा अतिरेक, आळशी स्वभाव या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणजे आरोग्याचा सत्यानाश! देव-दैव-अध्यात्मवादी भारतीय रोगट जीवनाला नशिबाचे भोगच मानतात. पूर्वजन्मीच्या पापांचं फळ म्हणून आपण आजारी तरी पडतो किंवा आरोग्य तरी बिघडतं असं समजून दंडात गंडा बांधणं, शरीरातील उष्णता कमी होण्यासाठी तांब्याचं कडं किंवा अंगठ्या वापरणं इत्यादी उपाय करतात. काही स्त्रिया मांत्रिकाने दिलेलं आरोग्यमंत्राचं बोटभर चिटोरं तांब्याच्या पेटीत किंवा नळीत घालून गळ्यात बांधतात. कशामुळे आरोग्य बिघडलं? ते शोधायचं राहिलं बाजूला. खुळचट मंत्र-तंत्र – जादूटोणा, छा-छू, मंतरलेलं पाणी हे काही उपाय नाहीत. पण मूर्ख माणसं शहाण्यांचं सांगणं कधी ऐकत नाहीत.

ही निरामय जीवन चर्चा करण्याचं एक कारण आहे. अलीकडेच एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने हाताखालच्या एका अधिकाऱ्याला तो ड्यूटीवर आल्या आल्या फैलावर घेतलं. कामचुकारपणा हे फैलावर घेण्याचं मुख्य कारण होतं. वरिष्ठांना अशी कटू कामं नेहमीच करावी लागतात. परिणामतः कामचुकारांच्या सवयीत प्रशासनाला उचित असं वर्तनबदल होणं अपेक्षित असतं. हाताखालच्या अधिकारी व्यक्तीने आपल्या झाल्या चुकीबद्दल दिलगिरी व्यक्त केली पाहिजे आणि भविष्यकाळी अशी चूक घडणार नाही, असं वचन दिलं पाहिजे. पण झालं भलतंच. वरिष्ठांच्या खडसावणीने कनिष्ठ अधिकाऱ्याचं ब्लडप्रेशर वाढलं. ते इतकं वाढलं की तो चक्क खाली कोसळला. पुढे काय ? दिलगिरी व्यक्त करण्याची वेळ वरिष्ठांवर आली. शिस्तप्रिय अधिकाऱ्याला विनाकारण प्रमादी ठरवण्यात आलं.

या घटनेत एखाद्या पोलीस अधिकाऱ्याचा रक्तदाब चक्कर येण्याइतका का वाढावा, हा फार मूलभूत प्रश्न आहे. त्यावरून तो नोकरी करण्यास अपात्र आहे हे तर सिद्ध होतंच. रक्तदाबाचा विकार आनुवंशदोष, स्थूलपणा, आळशीपणा, व्यायामाचा अभाव किंवा अपेयपान (मद्य घेणे) आणि मांसाहार ह्या कारणांनी होतो. शारीरिक सक्षमता (Physical Fitness) नसण्याचं ते लक्षण आहे. अशा व्यक्तीला ताणतणावाला सतत जेथे तोंड द्यावं लागतं, अशा पोलीस खात्यासारख्या नोकरीत ठेवणं चुकीचंच आहे. पोलीस खात्यातील माणूस मिलिट्रीतील शिपायाइतकाच निरोगी आणि दणकट, काटक, सहनशील, अफाट शक्तिसंपन्न असलाच पाहिजे.

आज पोलीस अधिकारी तर रोगपीडित आहेतच, पण पोलीससुद्धा शारीरिकदृष्ट्या अनफिट ठरतील असे आहेत. या पोलिसांकडून जनतेचं रक्षण होणं दूरच राहो, त्यांचं स्वतःचंही रक्षण होणं शक्य नाही.

अलीकडे पोलिसांच्या मानसिक स्थितीचा फारच गांभीयार्ने विचार केला जातोय. शारीरिक दृष्ट्या व्यक्ती योग्य आहे की नाही, हे जसं त्याची ही पावती आज पाहिलं जातं. तसंच मानसिकदृष्ट्या ती योग्य आहे काय, हेही काही तणावपूर्ण चाचण्या घेऊन ठरवावं. कारण काही मनोरुग्ण पोलिसांनी किंवा सैन्यातील शिपायांनी आपल्याच सहकाऱ्यांचे बळी घेतले आहेत. हा प्रकार सैन्यभरती किंवा पोलीस भरतीमधील त्रुटी जाहीर करणारा आहे. वरील उदाहरणातील चक्करबाज अधिकाऱ्याला सेवेतून विनापेन्शन मुक्त करावं. शारीरिक क्षमता नीट न राखण्याबद्दल त्याला दंड करावा हेच योग्य. प्रशासनात काही चुका राहिलेल्या असतात, त्या अशाप्रसंगी उघड होतात. त्यांची दखल वरिष्ठ पातळीवर धोरण आखण्यासाठी घ्यावी तरच देश बलिष्ठ होईल. कारण–

मुलाम्याचे नाणे । न चाले बाजारी
फिरविले जरी । देशोदेशी ॥ १
तुकोबांनी केला । उपदेश चोरव
त्यांचा आहे रोख । व्यवहाराकडे ॥ २
नोकर असू द्या । कोणत्याही जागी
असणे निरोगी । आवश्यक ॥ ३
रोगट, व्यसनी । कामचुकारांना
'मुक्त' करताना । दया नको ॥४
लाचखाऊ, लोभी। लोचट नोकरा
देऊ नका थारा। एक क्षण ॥५
कुंपणाला शेत । खाऊ देऊ नका
देशहिता धोका । बरा नाही ॥६
लठ्ठ, खादाडांनी । पोलीस न व्हावे
मिलिट्रीत द्यावे । त्यांना स्थान ॥७
शरीर नि मन । ज्यांचे निरामय
त्यांची लावा सोय । नोकरीत ॥८
कारभार हवा। जलद, तत्पर
प्रगतीचे सार । हेच आहे ॥ ९
नोकरांची सुस्ती । नोकराची मस्ती
देशा घातक ती । हेच खरे ॥१०



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

पान १ वरून

# सोलापूर जिल्ह्यात पावसाचे...

कुर्डूवाडी-बार्शी रस्त्यावरुन माढा मार्गे येत असताना इनोव्हा गाडी रात्री दोनच्या सुमारास गावानजीकच्या ओढ्यातून पाण्यात वाहून जात पुढे अडकली. यात पाच जण प्रवास करत होते. आनंद बगली आणि आणखी एक असे दोघे सोलापूर येथील तर सचिन शिराळ, रणजित चिंबल, सुशांत शिवशरण हे तिघे मोहोळचे रहिवासी प्रवास करत होते.

रात्री दोनच्या सुमारास वडशिंगे येथील ग्रामस्त तातडीने वाहन वाहून गेलेल्या ठिकाणी पोहचले. वाहनात अडकलेल्यापर्यंत दोरखंड व साखळी बांधत ते पोहचले. अडकलेल्या पाच जणांना ग्रामस्थांनी वाचवले.रविवारी रात्री झालेल्या पावसाने शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले. माढा बार्शी, माढा वैराग रस्त्यावरील वाहतूक पूर्णपणे बंद झाली आहे.

सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यात सोमवारी मध्यरात्रीपासून मुसळधार पाऊस पडत असून शेतकऱ्यांच्या पीकांचे अतोनात नुकसान झालं आहे.

माढा तालुक्यातील वाकाव तांदुळवाडी, राहुल नगर आणि दारफळ या गावांना पडू लागला पाण्याचा वेढा बसला आहे.

पावसामुळे भूम, परांडा इथही हाहाकार माजला आहे.

हा महाप्रलय आहे, हा निसर्गाचा मोठा अपघातच म्हणाव लागेल. शेतकऱ्याच्या घरात पाणी, शेतात पीकं आडवी झाल्याने डोळ्यात अश्रूंच्या धारा पाहायला मिळत आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील परंडा आणि भूम तालुक्यात शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झाल्याने ओला दुष्काळ जाहीर करण्यासाठी आपण पाठपुरावा करू, असे बांधावर जाऊन पाहणी केल्या आमदार तानाजी सावंत यांनी म्हटलं आहे.

सरकार खंबीरपणे उभा राहील, सरकारचे पंचनामे आणि मदत होईल, मात्र त्या अगोदर नुकसान ग्रस्तांना तत्काळ मदत केली जाईल, असे म्हणत तानाजी सावंत यांच्याकडून कार्यकर्त्यांना नुकसान ग्रस्तांच्या याद्या करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

खरिपाची पिके गेली, रब्बीची पेरणी होणार नाही, पुढे मोठा पाऊस आहे, पेरण्या लांबल्या गेल्या तर ओल्या दुष्काळाची मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

धाराशिवच्या परांडा येथील देवगावात चांदणी नदीचे पाणी वस्तीत घुसलं आहे. त्यामुळे, वस्तीतील घरांना कुलूप लावून लोक बाहेर पडली आहेत. चांदणी नदीला आलेल्या पुरामुळे गावाला पाण्याचा वेढा, महिलांसह गावकरी छतावर चढले होते.

पुराच्या पाण्यात पूर्णपणे संसार भिजला, काही घरांत सकाळपासून अन्नाचा कण शिजला नाही, असा थरारक अनुभव लोकांनी सांगितला.

भिंत खचली, चूल विझली होतं नव्हतं गेलं, अशीच परिस्थिती देवगावच्या वस्तीत पाहायला मिळाली, वस्तीत गुडघाभर पाणी आहे, पुराच्या पाण्यातून मार्ग काढत जीव वाचवत आहेत.

धाराशिवच्या देवगाव इथ घराच्या मंदिराच्या छतावर चढून गावकरी सैन्य दलाकडून रेस्क्यू करण्याची वाट पाहत होते. 24 जणांना सुखरूप बाहेर काढलं आहे.

वस्तीच्या कडेला 30 ते 35 फूट पाणी, हेलिकॉप्टर आलं नसतं तर आम्ही वाचलो नसतो, असे रेस्क्यू करण्यात आलेल्या ग्रामस्थांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्यातील सीना नदीकाठी पाणी पातळी वाढू लागल्याने अनेक गावात पाणी शिरू लागले. करमाळा तालुक्यातील संगोबा पूल, निलज, खडकी, बिटरगाव, अलजापूर, तरडगाव, बालेवाडी, पोटगाव, बोरगाव, दिलमेश्वर या गावानं सीना नदीच्या पुराचा फटका बसण्याची शक्यता आहे.

माढा तालुक्यातील वडशिंगे येथील ओढ्यात इरटिगा कार वाहून गेली'

माढा तालुक्यातील वडशिंगे येथील ओढ्यात इरटिगा कार वाहून गेली असून सोमवारी (ता. २२) रात्री दीडच्या सुमारास वडशिंगे येथील ग्रामस्थांनी स्वतःच्या धोक्यात घालून या पाच जणांना वाचवले.

रविवारी रात्री व सोमवारी पहाटे माढा तालुक्यातील सर्व महसुली मंडळात जोरदार पाऊस झाला. वडशिंगे भागांमध्ये जोरदार पाऊस झाला. रात्रीच्या सुमारास बार्शी वरून माढ्याच्या दिशेने येणारी एक ईरटीगा गाडी वडशिंगे येथील ओढ्यामध्ये वाहून गेली. यावेळी या ईरटीगा गाडीमध्ये पाच जण होते. ओढयामध्ये वाहून गेलेली ईरटीका गाडी ओढ्याच्या काही अंतरावर असलेल्या मंदिराच्या बांधकामाना लागून थांबली.

यावेळी गाडीत असलेल्या पाच जणांनी आरडाओरडा केला. रात्री दीडच्या सुमारास वडशिंगे येथील ग्रामस्थांनी स्वतःचा जीव धोक्यात घालत ओढ्यामधून दोराच्या साह्याने ईरटीगा गाडीमध्ये अडकलेल्या पाच जणाला बाहेर काढले व जीवदान दिले. सकाळी ग्रामस्थांनी ओढयामधून ईरटीगा गाडी ट्रॅक्टरच्या साह्याने ओढून बाहेर काढली.

## वात्रटिका

### ट्रम्प्या तात्या

स्वस्त झाला भारत
मस्त झाला भारत...
राहू नकाच तिथं
चला या लवकर परत...
निर्णय घेतात ते पण
चर्चा आमच्या धोरणाची....
तात्याचे सोंग झोपण्याचे
आणि नक्कल घोरण्याची...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# राहुल कवडे यांची पुणे जिल्हा अध्यक्षपदी निवड

## राजे प्रतिष्ठान - कामगार सेनेत नवे नेतृत्व



**पुणे (कटूसत्य वृत्त):-** श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले महाराज यांच्या प्रेरणेतून कार्यरत असलेल्या राजे प्रतिष्ठान – कामगार सेना, महाराष्ट्र राज्य या संघटनेच्या पुणे जिल्हा अध्यक्षपदी राहुल कवडे यांची नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

या निवडीबद्दल संघटनेचे संस्थापक खा. श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले महाराज, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जितेंद्र खानविलकर, उपाध्यक्ष बशीरभाई कुरेशी, संघटक प्रमुख अशोक शिगवण, कार्याध्यक्ष प्रकाश कोळी, सरचिटणीस चंद्रकांत धडके, खजिनदार नारायण कोळी तसेच परीक्षित खुने सहसचिव महाराष्ट्र राज्य यांनी राहुल कवडे यांचे हार्दिक अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संघटनेच्या माध्यमातून कामगार आणि सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी प्रभावी कार्य करत असलेल्या राजे प्रतिष्ठान – कामगार सेनेच्या पुणे जिल्ह्यातील नेतृत्वाची जबाबदारी आता राहुल कवडे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

राहुल कवडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'संघटनेने माज्यावर दाखवलेला विश्वास मी कधीही फोल ठरवणार नाही. कामगारांच्या प्रश्नांसाठी लढा देणे, संघटनेचा झेंडा खंबीरपणे पुढे नेणे, हीच माझी प्राथमिकता असेल.'

या निवडीमुळे पुणे जिल्ह्यात राजे प्रतिष्ठान – कामगार सेनेच्या कार्याला नवे बळ मिळेल, असे संकेत मिळत आहेत.

# टेंभुर्णी परिसरात अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभूर्णी शहर आणि परिसरात रविवारी रात्री आठ वाजल्यापासून मुसळधार पावसाने धुमाकूळ घालून जोरदार झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. टेंभुर्णी परिसरातील चव्हाणवाडी टें, वेणेगाव, बेंबळे, मिटकलवाडी, अकोले बुद्रुक, परिते, परितेवाडी, आहेरगाव, अकुंबे, भुइंजे, पैलवान, पिंपळनेर, सापडणे टें, तांबवे टें, लगोरी, शिराळ, आढेगाव, चांदज, भिमानगर रांजणी, उजनी टे, आलेगाव, रुई, गार अकोले, टाकळी, वडोली, अशा भागामध्ये जोरदार पाऊस झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या कांदा, मका, फळबागा डाळिंब, केळी, पेरू, भाजीपाला, तसेच ऊस पिकांचे फड अक्षरशः भुईसपाट झाले आहेत. यामध्ये हजारो हेक्टरवरील फळबागांचे आणि पिकांचे नुकसान झाले आहे तर शहरातील सिद्धार्थनगर, इंदिरानगर सह परिसरातील जवळपास दोनशे घरामध्ये पावसाच्या पुराचे पाणी शिरून नुकसान झाले आहे.या पावसामुळे जिकडे तिकडे पाणीच पाणी वाहत होते.या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त शेतिपिकांचे सरसकट पंचनामे करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.



सोलापूर जिल्ह्यात काल झालेल्या जोरदार पावसामुळे माढा तालुक्याबरोबर तालुक्यातील शेतकऱ्यांचे अनुनाथ नुकसान झाले आहे तरी सरकारने तातडीने सरसकट पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करून तातडीने मदत करावी.

**– अमोल जगदाळे,** प्रहार संघटना सोलापूर
धाराशिव संपर्कप्रमुख

माढा तालुक्यात काल रात्री जोरदार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे तसेच शेतकऱ्यांच्या फळबागा ऊस व इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे तरी सरकारने तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून सर्व शेतकऱ्यांना मदत करावी.

माजी राष्ट्रवादी माढा तालुका अध्यक्ष औदुंबर भाऊ महाडिक- देशमुख

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनातर्फे सर्वोतोपरी मदत - पालकमंत्री गोरे

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** अतिवृष्टीमुळे सांगोला तालुक्यातील मंडळाच्या ६ मंडळातील गावांमध्ये शेतपीक, फळपीक, बंधारे, रस्ते, घरे, पुलांचे नुकसान झाले आहे. आपत्तीच्या काळात शासन जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून नुकसानीच्या मदतीपासून एकही नागरिक वंचित राहणार नाही. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनातर्फे सर्वोतोपरी मदत दिली जाईल अशी ग्वाही ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

अतिवृष्टीमुळे सांगोला तालुक्यातील महिम, येथील वाहून गेलेल्या पुलाची, तसेच महूद वाकीशिवणे,कडलास येथील घरे, शेतीचे झालेल्या नुकसानीची पालकमंत्री गोरे यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

यावेळी त्यांच्या समवेत आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, माजी आमदार शहाजी बापू पाटील, माजी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम,प्रांताधिकारी अमित माळी, तहसीलदार संतोष कणसे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, उपविभागीय कृषी अधिकारी लांडगे, गटविकास अधिकारी उमेश कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी दिपाली जाधव उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री गोरे म्हणाले, सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या शेतपिकांचे, घरांचे तसेच सार्वजनिक मालमत्तांचे तात्काळ पंचनामे करून अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना प्रशासनास दिल्या आहेत.

महिम येथे अतिवृष्टी झाल्याने दोन मुले वाहून गेली होती. त्या



ऐवळे कुटुंबीयांना आवश्यक ती मदत करण्यात येईल. महिम येथे अरुंद पूल असून पुलाच्या रुंदीकरणाचे काम संबंधित विभागाने तात्काळ करावे. कडलास येथे ढगफुटी झाल्याने कोळी बांधवांच्या राहत्या घरात पाणी शिरल्याने मोठे नुकसान झाले असून, ज्यांना आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले आहेत त्यांची कामे तात्काळ सुरू करावीत तसेच ज्यांना जागा उपलब्ध नाहीत त्यांना जागा उपलब्ध करून देण्याच्या सूचना ही यावेळी त्यांनी दिल्या.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाची पाहणी करताना पालकमंत्री गोरे यांनी स्थानिक शेतकऱ्यांशी, गावकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना धीर दिला. तसेच शासन पूर्णपणे आपल्या पाठीशी असून शासनतर्फे नुकसानी संदर्भात लवकरच मदत दिली जाईल असे त्यांनी यावेळी सांगितले.

उंदरगाव ता. माढा - जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सतत होत असलेला पाऊस, अतिवृष्टी तसेच सीना व भीमा नदीला आलेला महापूर यामुळे सोलापूर जिल्ह्यात ओला दुष्काळ सदृश्य परिस्थिती असून खरीप हंगामाची जवळपास सर्व पिके शेतकऱ्यांच्या हातून गेल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शासनाकडून शेतकऱ्यांना तातडीने जी जी मदत देणे शक्य आहे ती मदत देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच प्रशासकीय यंत्रणेला अतिवृष्टी व पुराच्या पाण्यामुळे झालेल्या शेती पिकाच्या नुकसानीचे सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत, अशी माहिती पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी माढा तालुक्यातील उंदरगाव येथे अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाची पाहणी करताना दिले. तसेच अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची सर्व माहिती मंत्रिमंडळ बैठकीत ठेवून शासनाकडून जास्तीत जास्त मदत सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तात्काळ पुढाकार घ्यावा - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** बार्शी तालुक्यातील सर्वच महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीमुळे अनेक गावांमधील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर बार्शी तालुक्यातील वैराग दहिटणे मुंगशी तडवळे महसूल मंडळातील गावांचा दौरा खा. ओमप्रकाश राजे निंबाळकर व बार्शीचे आमदार श्री दिलीप सोपल साहेब यांच्या समवेत करण्यात आला असून यात वैराग मंडळातील दाहिटणे (ता. बार्शी) येथील अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करण्यात आली आहे पाहणी वेळी बार्शी विभागाचे उपविभागीय अधिकारी पडदुने , तहसीलदार, जिल्हा कृषी अधिकारी तालुका कृषी अधिकारी तसेच महसूल मंडळातील अधिकारी समवेत पाहणी करण्यात आली आहे

या पाहणीदरम्यान शेतकऱ्यांनी अतिवृष्टीमुळे उभ्या पिकांचे झालेले नुकसान, पशुपालनावरील परिणाम याबाबत दोन्ही जनप्रतिनिधींना सविस्तर माहिती दिली. 'आम्ही पेरलेले कांदा, सोयाबीन, बाजरी, तूर, उडीद, मूग आदी पिके पाण्याखाली गेल्याने पूर्णपणे नष्ट झाले आहे. उर्वरित पिकांमध्येही रोगराई पसरत असून उत्पादनावर



गंभीर परिणाम होईल,' असे शेतकऱ्यांनी सांगितले.

खासदार निंबाळकर व आमदार सोपल यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन पाहणी केली आणि शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या. यावेळी प्रशासनातील अधिकाऱ्यांना त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या की - नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे तात्काळ करून घ्यावेत. शेतकऱ्यांना योग्य व न्याय्य नुकसानभरपाई मिळावी यासाठी त्वरीत कारवाई करावी. शासनाने ठरवलेले मदतीचे निकष शिथिल करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.

अशा सूचना खासदार ओमप्रकाश राजे निंबाळकर व आमदार दिलीप सोपल साहेब यांनी अधिकाऱ्यांना दिल्या तसेच शेतकऱ्यांना तात्काळ मदत करणे बाबत प्रशासनाने आपल्या स्तरावर लवकर हालचाली सुरू करून शेतकऱ्यांना मदत करावी अशा सूचना प्रशासनास दिल्या असून अतिवृष्टीने बेहाल झालेल्या शेतकऱ्यांना प्रशासनाने साहाय्य करावे असे सुतोवाच केले यावेळी परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते

# राज्यमंत्री कदम यांच्या कडून करमाळा व माढा तालुक्यातील शासकीय योजनांचा आढावा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** राज्यात दिनांक 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2025 या कालावधीत सेवा पंधरवडा अंतर्गत विविध उपक्रम महसूल विभागाच्या वतीने घेण्यात येत आहेत. या मध्ये शेतातील पाणंद रस्त्यांचे सर्वेक्षण, अतिक्रमण हटवणे, नवीन रस्ते तयार करणे, अरुंद रस्त्यांचे रुंदीकरण, जिवंत सातबारा नोंदी व वाटप याची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी, असे निर्देश, गृह, महसूल, ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा, अन्न औषध प्रशासन विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिले.



करमाळा येथे आयोजित करमाळा व माढा तालुक्यातील विविध शासकीय विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, प्रांताधिकारी जयश्री आव्हाड, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्न औषध प्रशासन विभागाचे सहाय्यक आयुक्त साहेबराव देसाई, माळ्याचे गटविकास अधिकारी महेश सुळे करमाळ्याचे गटविकास अधिकारी अमित कदम यांच्यासह अन्य संबंधित विभागाचे तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

राज्यमंत्री कदम यांनी 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर 2025 दरम्यान राबविण्यात येणाऱ्या सेवा पंधरवाडा उपक्रमात महसूल विभागाच्या विविध कामांची प्रगती तपासली. तसेच घरकुल योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मोफत पाच ब्रास वाळू शासनामार्फत दिली जाते. याची अंमलबजावणी होत आहे का याची चौकशी करण्यात आली. वाळू उपलब्ध नसल्यास जप्त वाळू किंवा अधिकृत वाळू उपसा गटांमार्फत मोफत वाळू देण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले. करमाळा व माढा तालुक्यातील घरकुल उद्दिष्ट पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

तलाठी व ग्रामसेवकांनी महसूल निर्णयांची अंमलबजावणी करून नागरिकांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवावी, तसेच देवस्थान इनामी जमिनी, गौण खनिज व भूमी अभिलेखांचे पुनरावलोकन करून प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत. तसेच अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या आढाव्यात अंत्योदय योजनेत नवीन नावे घेताना लोकप्रतिनिधींना विश्वासात घेणे व गरजूंनाच लाभ मिळावा याची दक्षता घेण्याचे निर्देश श्री. कदम यांनी दिले.

ग्रामविकास विभागाच्या योजनांमध्ये मुख्यमंत्री ग्राम समृद्ध योजना, मनरेगाअंतर्गत विहिरी, शाळांचे कंपाउंड, अंतर्गत रस्ते, दिव्यांग प्रमाणपत्र वाटप यांचा समावेश असून, मिळालेला निधी पूर्णपणे खर्च करावा व मागील वर्षी खर्च न झाल्याची कारणे सादर करावीत, अशी सूचना करण्यात आली. याबाबतचा आढावा २ ऑक्टोबरनंतर घेण्यात येणार आहे. त्याप्रमाणेच अन्न औषध प्रशासनाने जिल्ह्यात कुठेही भेसळ होणार नाही याबाबत काटेकोरपणे नियोजन करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

या बैठकीत महसूल, ग्रामविकास, अन्न नागरी पुरवठा व अन्न औषध प्रशासन विभागाच्या योजनांची अंमलबजावणी, सेवा पंधरवाडा उपक्रम, घरकुल वाटप, वाळू वितरण, रोजगार हमी योजना व अंत्योदय योजनेचा आढावा घेण्यात आला. प्रारंभी अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर यांनी करमाळा व माढा तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेने केलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत सादर केली.

# अतिवृष्टीमुळे सोलापूर जिल्ह्यातील संगोबा गावातील शेतीचे मोठे नुकसान



**खेड (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यातील संगोबा गावात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली गेल्याने त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी प्रशासनाकडे मागणी करताना पंचनामे करून, तसेच मागील पुरस्थितीचा विचार करून संपूर्ण गावातील शेतकऱ्यांना न्याय्य नुकसानभरपाई देण्याची विनंती केली आहे.

ग्रामस्थांच्या या मागणीची तात्काळ दखल घेत गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी आज संगोबा गावाला भेट दिली. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. उपस्थित अधिकाऱ्यांकडून नुकसानग्रस्त क्षेत्राची सविस्तर माहितीही त्यांनी घेतली. ग्रामस्थ व स्थानिक प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, पावसाचे प्रमाण आणखी वाढल्यास आगामी काळात पुरस्थिती गंभीर होण्याची शक्यता असल्याचे निदर्शनास आले.

या परिस्थितीची गांभीयार्ने दखल घेत कदम यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना तातडीने आवश्यक ती उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले. नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये यासाठी ग्रामस्थांना सुरक्षित स्थळी स्थलांतरित करण्याचे आदेश देण्यात आले. यावेळी गृहराज्यमंत्री कदम यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना देत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचा पंचनामा वेगाने पूर्ण करून शासनाकडे अहवाल सादर करण्याचे आदेश दिले, जेणेकरून शेतकऱ्यांना लवकरात लवकर नुकसानभरपाई मिळू शकेल. तसेच संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन बचावकार्य, आरोग्यसेवा व तात्पुरत्या निवाऱ्याच्या सुविधा यासाठी स्वतंत्र यंत्रणा सज्ज ठेवण्याचे निर्देशही कदम यांनी दिले. त्यांच्या या पाहणी दौयामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला असून शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नाशिक येथील पत्रकार हल्ल्यातील हल्लेखोरांवर तात्काळ कडक कारवाई करा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नाशिकच्या काही पत्रकार बांधवांवर त्र्यंबकेश्वर येथे वृत्तांकनासाठी जात असताना करण्यात आलेला हल्ला हा अतिशय गंभीर आणि निंदनीय प्रकार असून राज्यात पत्रकार असुरक्षित असून संभाजी ब्रिगेड च्या वतीने या भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करून शासनाने तात्काळ हल्लेखोरांवर कडक कारवाई करावी अशी मागणी संभाजी ब्रिगेड पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम यांनी मुख्यमंत्री याना ईमेल द्वारे केली आहे.

पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत. त्यांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या दोषींवर तात्काळ आणि कठोर कारवाई करण्यात यावी तसेच पत्रकार सुरक्षा कायद्याची कडक अंमलबजावणी करण्यात येऊन पत्रकारांना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. पत्रकार यांच्यावरील हल्ल्याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन कारवाई नाही केल्यास संभाजी ब्रिगेडच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुद्धा संभाजी ब्रिगेडचे वतीने देण्यात आले आहे

# सोलापूरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान उभारणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट मैदान उभारण्यासंदर्भात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ आणि जिल्हा क्रिकेट असोसिएशन यांच्यात करार झाला. दरम्यान, या करारमुळे खेळाडूंना अत्याधुनिक प्रशिक्षण सुविधा व व्यावसायिक मार्गदर्शन मिळणार आहे.

शहरासाठीही हे मैदान महत्त्वाचे ठरेल, ज्यामुळे भविष्यात येथे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट सामने आयोजित करता येतील. या ऐतिहासिक निर्णयामुळे सोलापूरच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा मिळेल.



विद्यापीठाच्या राष्ट्रमाता जिजाऊ सभागृहात कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर, जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष दिलीप माने, चेअरमन आ. रणजीतसिंह मोहिते पाटील, संयुक्त सचिव खा. धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत क्रीडा संचालक व प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे आणि सहसचिव चंद्रकांत रेम्बरसू यांच्या स्वाक्षऱ्या झाल्या.

# सोलापूर जिल्ह्यात १८६ ग्रामपंचायतींमधील गुंठेवारी होणार नियमित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सेवा पंधरवड्यात ग्रामीण भागातील प्रश्न सोडविण्यावर महसूल प्रशासन, जिल्हा परिषद यंत्रणा काम करीत आहे. सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत ज्या लाभार्थींना गावठाण हद्दीत जागा आहे, ती जागा नियमित करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेने घेतला आहे.


या निर्णयाचा लाभ जिल्ह्यातील १८६ ग्रामपंचायतीमधील ८६० घरकुल लाभार्थींना होणार आहे. यामध्ये मंगळवेढा व अक्कलकोट तालुक्यातील सर्वाधिक लाभार्थींचा समावेश आहे. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर हा कालावधी सेवा पंधरवडा म्हणून राबविण्याच्या सूचना राज्य शासनाने दिल्या आहेत.

त्यानुसार दुसऱ्या टप्प्यात सर्वांसाठी घरे या उपक्रमांतर्गत सेवा दिली जाणार आहे. ज्या लाभार्थ्यांना घरकुल मंजूर आहे, पण जागा गुंठेवारीची असल्याने बांधकामास अडचणी येत आहेत.

> गावठाण हद्दीत व गावठाणापासून ५०० मीटर अंतरावर घरकुल मंजूर असलेल्या लाभार्थींना गुंठेवारीची जागा नियमानुकूल करण्यात येणार आहे. तालुकानिहाय याची माहिती संकलित केली आहे. याचा ८६० लाभार्थ्यांना लाभ होणार आहे. याबाबत गटविकास अधिकारी, तहसीलदार यांच्या स्तरावर नियमानुकूल करण्याच्या सूचना दिल्या आहेत.
>
> **-कुलदीप जंगम,** सीईओ, जि. प. सोलापूर

# 'कुर्डुवाडीत घरफोडी' १० तोळ्यांचे दागिने, २५ हजारांची रोकड लंपास

**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राहणाऱ्या दोन भावांच्या बंद घरातून भरदिवसा चोरट्यांनी सुमारे दहा तोळे वजनाचे दागिने, चांदीच्या वस्तू व रोख २५ हजार रुपये चोरून नेले. ही घटना शनिवारी (ता.२०) दुपारी साडेतीन ते सायंकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान घडली.



रवींद्र भांबुरे व वीरेंद्र भांबुरे (दोघे रा. कुडुर्वाडी) यांनी कुडुर्वाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दोन्ही भावांची घरे शेजारी असून घरासाठी एक दरवाजा आहे. रवींद्र भांबुरे हे कुटुंबीयांसह दवाखान्यासाठी पुणे येथे गेले होते. वीरेंद्र भांबुरे यांचे काही अंतरावर टेलरिंगचे दुकान आहे. ते दुकानातून ३ वाजता घरी येऊन जेवण करून कुलूप लावून गेले.

सहा वाजता भांबुरे यांनी घरी येऊन कुलूप उघडले असता चोरी झाल्याचे लक्षात आले. फिर्यादींच्या जिन्याचा दरवाजा भिजला असल्याने उघडा राहत होता. या दरम्यान चोरट्यांनी जिन्याच्या दरवाजातून प्रवेश केला. दोन्ही भावांच्या घरातील चोरी केली. यामध्ये वीरेंद्र भांबुरे यांच्या घरातील साडे तीन तोळ्याचे गंठण व ५० ग्रॅम चांदीचा कंबरपट्टा चोरीस गेला.

रवींद्र यांच्या घरातील सुमारे साडे सहा तोळ्याचे गंठण, नेकलेस, अंगठ्या व कानातील सोन्याचा ऐवज, चांदीचे चार ब्रासलेट, दोन पैंजण जोड, हार व रोख पंचवीस हजार रुपये असा दोन्ही मिळून सुमारे १ लाख ९२ हजार रुपयांचा ऐवज चोरीस गेल्याचे फियार्दीत नमूद करण्यात आले आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी पाहिले. श्वान पथक व ठसे तज्ञ यांना पाचारण करण्यात आले होते. श्वानपथक रस्त्यावरच घुटमळले. अधिक तपास पोलिस करत आहेत.

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) गरजू व्यक्तीस मानपान न पाहता कोणाचीही मदत घेणे उचित असते या अर्थाची म्हण २) टेकडी (हिंदीत) ३) डक उलट लिहा ४) एक आडनाव ५) बाण, तीर ६) एक म्हण-उथळ पाण्याला ***** फार ७) तांदूळ, भात (इंग्रजीत) ९) आजच्या पूर्वीचा गेलेला दिवस ११) परदेस चित्रपटाती अभिनेत्री-*** चौधरी १३) हेराफेरी चित्रपटातील अभिनेता-*** रावल १४) पतीचा भाऊ १६) नाट्य, ड्रामा (मराठीत) १७) शर्ट (ग्रामीण भाषेत) १९) गायीला दिला जाणारा नियमित खुराक २०) नट उलट लिहा २३) बॉडीगार्ड चित्रपटातील अभिनेत्री २६) स्वराज्याची पहिली राजधानी असलेला गड २७) ठाणे लगतचा जिल्हा २९) वांग्यामध्ये मसाला भरून केलेले ३२) वास, गंध ३६) फळातील गोड द्रव ३८) सोळा गुणिले दोन ३९) एक म्हण-दाम करी ** ४१) मार्ग, वाट (हिंदीत) ४२) तीन दुणे ४३) एक (इंग्रजीत) ४४) बारा गुणिले पाच

**आडवे शब्द :** १) भारताचे केंद्रीय नेते-नितीन **** ४) लातूरचे आमदार-अमित **** ७) कोकणातील एक आमदार-नितेश ** ८) पुष्कळ, भरमसाठ ९) बांगड्या विक्रीचा व्यवसाय करणारा १०) तरचा जोडीदार ११) दुधावरील साय १२) स्वभावाने खाष्ट १३) छ. शिवराय या गडावर असताना सिध्दी जोहरने गडाला वेढा टाकला होता १५) कोंढाणा किल्ला घेणारा छ. शिवरायांचा शूर सरदार १८) कापड फाटताना होणारा आवाज २१) पाण्याची लहर २२) दहा वर्षांचा काळ २४) नऊ भागिले तीन २५) पाच आणि सहा मिळून होणारी संख्या २७) तापमान पाहण्यासाठी वापरतात तो धातूचा पातळ चकचकीत घटक २८) घोड्यावर बसल्यानंतर पाय ठेवण्यासाठी असलेली लोखंडी कडी ३०) मवाळच्या विरूध्दार्थी ३१) नाम उलट लिहा ३२) कथेतील पंख असलेली स्त्री ३३) गरम मसाल्यातील एक घटक ३४) घड्याळ (हिंदीत) ३५) नवे कोरे, नवीन कोऱ्या न वापरलेल्या नोटा या अर्थाने ३७) घराच्या पायाभरणीसाठी वापरतात ते दगड, मुरूम इ. मटेरियल ३९) याच्यापासून धागा बनतो ४०) रास उलट लिहा ४२) उन्हाळा (इंग्रजीत) ४३) एक म्हण-काखेत कळसा अन् गावाला *** ४५) अकरा गुणिले तीन ४६) मुलाची पत्नी, स्नुषा

## सुडोकु - 61

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | 6 | | 7 | | 9 | |
| 1 | 2 | 6 | | | | | 4 | |
| | 9 | | | 2 | | 6 | | |
| 6 | | | | | | | 2 | 4 |
| 9 | 3 | 1 | | 7 | 4 | | | |
| | 4 | 5 | 8 | 3 | 6 | | 7 | 9 |
| 3 | 5 | | 7 | 1 | | | 6 | |
| | | 2 | | | 3 | 8 | 1 | 5 |
| | | | | | 2 | 4 | | |

# सोलापूर जिल्ह्यात धार्मिक पर्यटनाबरोबरच कृषी पर्यटनाला मोठी संधी - आ.सुभाष देशमुख

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हात पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या निमित्ताने अनेक ग्रामपंचायतींना या दृष्टीने प्रयत्न करण्याची संधी मिळणार आहे. चिंचणी येथे सात दिवस पर्यटन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने पर्यावरण दिंडी, महिलांसाठी पारंपरिक खेळ, बाल चित्रपट महोत्सव, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान, आध्यात्मिक कार्यक्रम, वृक्षारोपण आणि स्वच्छता मोहीम आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे आ. देशमुख यांनी सांगितले.



सोलापूर जिल्हात धार्मिक पर्यटनाबरोबरच कृषी पर्यटनामुळे स्थानिक व्यवसायाला अधिक चालना मिळण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने पर्यटन महोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी पंढरपुरात पत्रकार परिषदेत केले.यामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार आहेत.

सोलापूर सोशल फाउंडेशनच्या वतीने २७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान जिल्ह्यात पर्यटन महोत्सव साजरा केला जाणार आहे.पर्यटन महोत्सवामध्ये जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी व स्थानिक नागरिकांनी सहभागी होऊन महोत्सव साजरा करावा असे आवाहन केले. दरम्यान,चिंचणी (ता. पंढरपूर) येथे पर्यटन महोत्सवाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.याच अनुषंगाने २८ सप्टेंबर रोजी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत परिसंवादाचे आयोजन करण्यात आल्याचेही आमदार देशमुख यांनी सांगितले.

या महोत्सवादरम्यान धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्त्व असलेल्या ठिकाणांविषयी लोकांपर्यंत माहिती देणे, कृषी पर्यटन व्यवसायाच्या दृष्टीने प्रयत्न करणे, व्यक्तिमत्त्व विकासावर भर देणे, स्थानिक पातळीवर तयार केल्या जाणाऱ्या मालाला बाजारपेठ मिळवून देणे, त्यातून रोजगार निर्मिती करणे, पर्यावरण संतुलन राखणे अशा मुद्द्यांवर या महोत्सवामध्ये काम करण्यात येणार आहे.

पंढरपूर, अक्कलकोट, सोलापूर या ठिकाणी धार्मिक पर्यटनाला मोठ्या प्रमाणावर संधी आहे.या ठिकाणी चांगल्या सोयी सुविधा निर्माण केल्यानंतर आणखी पर्यटन वाढण्यास मदत होणार आहे.याबरोबरच कृषी पर्यटनाच्या माध्यमातून देखील स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे.सोलापूर जिल्ह्यात पर्यटन व्यवसाय अधिक वाढावा,यासाठी लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी सदर महोत्सवाचे आयोजन करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अजित कंडरे यांनी केले, तर मान्यवरांचे स्वागत मोहन अनपट यांनी केले. यावेळी अनंता चव्हाण, विजय शेलार, शिवाजी दरेकर, विनोद जगदाळे, गणेश पाटील, समाधान चव्हाण, व लोकमंगल परिवाराचे अनेक मान्यवर उपस्थित होते

# अतिवृष्टीने उद्ध्वस्त झालं बळीराजाचं जीवनः

## राज्यात 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतपिकांचं मोठं नुकसान झालं आहे. अतिवृष्टीने शेतात उभं असलेलं पीक जमीनदोस्त झालं आहे. बळीराज्याचं आयुष्य उध्वस्त झालंय, त्याचे संसार मोडले आहेत, आणि त्याच्या मेहनतीचं स्वप्न भंगलेलं आहे. या संकटात राज्यातील लाखो शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

गेल्या काही आठवड्यांपासून महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र तसेच कोकणातील अनेक भागांत सतत पावसाचा कहर सुरू आहे. परिणामी, सोयाबीन, तूर, भात, कापूस यासारख्या प्रमुख पिकांचं प्रचंड नुकसान झालं आहे. काही भागांत तर शेतांमध्ये पाणी साचून राहिलं असून पीक पुन्हा उभं करणंही अशक्य झालं आहे.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने तात्काळ पुढाकार घेऊन 'ओला दुष्काळ' जाहीर करावा, अशी जोरदार मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे. अनेक राजकीय नेत्यांनी देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं लक्ष वेधत म्हटलंय की, "देवाभाऊ, तुमच्या नावातच 'देव' आहे. बळीराजावर ओढावलेलं हे संकट तुमच्या काळजावर घाव कसं घालत नाही ?"

राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी सध्या तरी मदत निधी, विमा भरपाई, तसेच व्याजमाफीसारख्या उपाययोजना जाहीर केल्या नसल्या तरी, जनतेचा आणि शेतकऱ्यांचा सरकारकडून अपेक्षेचा कडेलोट झालेला आहे.

शेतकरी नेते रवींद्र देशमुख यांनी सांगितलं, 'हे नैसर्गिक संकट शेतकऱ्यांसाठी जीवघेणं आहे. सरकारने तात्काळ 'ओला दुष्काळ' घोषित करून आर्थिक मदतीसाठी पावलं उचलावीत. अन्यथा शेतकऱ्यांचं जगणं असह्य होईल.'

मुख्यमंत्री यावर काय भूमिका घेतात, याकडे आता संपूर्ण राज्याचं लक्ष लागून आहे. बळीराजा संकटात आहे .आता सरकारनं मायबाप होऊन मदतीचा हात द्यावा, ही काळाची गरज बनली आहे.

# आम्ही ईव्हीएम हॅक केले तर यांना वाईट वाटतेय : रेखा गुप्ता

**नवी दिल्ली, (कटुसत्य वृत्त):-** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी गेल्या काही दिवसांपासून मतचोरीच्या मुद्द्यावरून भाजपला धारेवर धरले आहे. तसेच ईव्हीएमबाबतही संशय व्यक्त करत निवडणूक आयोगावर देखील तिखट टीका केली आहे. यादरम्यान भाजप नेत्या तथा दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी आम्ही ईव्हीएम हॅक केले तर विरोधकांना (काँग्रेस) वाईट वाटतेय, असे खळबळजनक वक्तव्य केले आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांच्याकडून होणारे सततचे आरोप भाजप नेत्याला मान्य आहेत की काय ? अशी चर्चा आता सुरू झाली आहे. तसेच त्यांच्या या वक्तव्यामुळे राहुल गांधींचे आरोप भाजपला मान्य आहेत असाच अर्थ निघत असल्याचा दावा आम आदमी पक्षाने केला आहे.



# अतिवृष्टीने नुकसान ग्रस्त भागात परिचारकांची अधिकाऱ्यांसह पाहणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यात गेल्या तीन-चार दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नुकसान झालेल्या शेतीची माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांसमवेत पाहणी केली.



सततच्या पावसामुळे पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची द्राक्ष, ऊस, डाळींब, कांदा, मका आदी पिकांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान फार मोठ्या प्रमाणात झाले आहे.

दरम्यान आज पंढरपूर तालुक्यातील कासेगाव, अनवली, मुंढेवाडी, रांझणी, पुळूज, पुळूजवाडी, शंकरगाव, नळी येथील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागाची मा.आ.प्रशांत परिचारक यांनी तहसिलदार, कृषी सहाय्यक, सर्कल, तलाठी, ग्रामसेवक यांच्या समवेत पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. सततच्या अतिवृष्टीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेल्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.

द्राक्ष बाग, डाळींब, फळ बागा व ऊसाच्या नवीन लागणीच्या क्षेत्रामध्ये खुप मोठ्या प्रमाणात पावसाचे पाणी साठल्यामुळे शेतकऱ्यांच्या द्राक्ष, डाळींब, फळ बाग व ऊसाचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्याची पाहणी केली.

मुंढेवाडी येथील रस्त्याच्या बाजूच्या चाऱ्या बुजल्यामुळे रस्त्यावरती पुर्णपणे पाणी वाहत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधून रस्त्याच्या बाजूच्या पाणी निचरा होण्याच्या दृष्टिकोनातून कार्यवाही करावी असे सांगितले. तसेच पुळूज भागातील रस्त्यावरील छोटे पूल पावसाच्या पाण्याखाली गेलेले आहेत. तेथे नवीन पूल बांधण्याचे प्रस्ताव शासनाकडे सादर करावे अश्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांना देण्यात आल्या.

पंढरपूर तालुक्यात सततच्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी केली आहे. तरी या पिकांचे पंचनामे करून शासनाकडून शेतकऱ्याला जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळणेसाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व महाराष्ट्र राज्याचे कृषीमंत्री यांच्याकडे मा. आ.प्रशांत परिचारक हे भेटून मागणी करणार आहे.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती हरीष गायकवाड, पंडीतराव भोसले, राजुबापु गावडे, सुभाष मस्के, सुदाम मोरे, रतिलाल गावडे, प्रशांत देशमुख, हरीभाऊ फुगारे, बाळासाहेब शेख, हरीभाऊ गांवधरे व शेतकरी मोठ्या संख्यने उपस्थित होते.

# चांदणी व खासापुरी धरणातून मोठा विसर्ग

## सीना-भोगावती नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**परंडा (कटूसत्य वृत्त):-** काल रात्री परंडा तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे चांदणी व खासापुरी धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक झाली आहे. परिणामी, दोन्ही धरणांमधून भोगावती नदीपात्रात मोठा विसर्ग सुरू असून प्रशासनाने नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन सहाय्यक अभियंता श्रीमती आर. बी. माने (धाराशिव पाटबंधारे उपविभाग क्र. ४, परंडा) यांनी केले आहे.

चांदणी धरणाचे सर्व २८ स्वयंचलित दरवाजे उघडण्यात आले असून २७,३५६ क्यूसेक्सने विसर्ग सुरू आहे. येत्या काही तासांमध्ये हा विसर्ग वाढण्याची शक्यता आहे.

त्याचप्रमाणे, खासापुरी धरणाच्या सांडव्यावरून ६३,४२७ क्यूसेक्सने विसर्ग सुरू आहे. येथील पाण्याचीही आवक वाढत असून विसर्गात वाढ होण्याची शक्यता जलसंपदा विभागाने व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, चांदणी आणि खासापुरी या दोन्ही धरणांचा विसर्ग सोलापूर जिल्ह्याच्या मोहोळ तालुक्यातील देगाव गावाजवळ संगम होतो. त्यामुळे चौधरी वस्तीला पाण्याचा वेढा पडण्याची शक्यता असून, त्या भागात बेट सदृश परिस्थिती निर्माण होऊ शकते.

सीना-भोगावती नदीकाठच्या सर्व नागरिकांनी व शेतकऱ्यांनी खबरदारी घ्यावी, नदीपात्राजवळ जाणे टाळावे आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन सहाय्यक अभियंता आर. बी. माने (धाराशिव पाटबंधारे उपविभाग क्र. ४, परंडा) यांनी केले आहे.

# सोलापूरात गुरुवारी राष्ट्रीय डाळिंब उत्पादकांचा मेळावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर च्या 21व्या वर्धापन दिनानिमित्त गुरुवार दि. 25 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 10 वाजता राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूर येथे राष्ट्रीय डाळिंब उत्पादकांचा मेळावा आणि राष्ट्रीय डाळिंब दिन उपक्रम आयोजित करण्यात आला आहे, अशी माहिती राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्राचे संचालक डॉ. राजीव मराठे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे संचालक डॉ. राजीव मराठे हे भूषविणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून,मॅग्नेट, पुणेचे प्रकल्प संचालक विनायक कोकरे,महाराष्ट्र राज्य फलोत्पादन संचालक अंकुश माने आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या राष्ट्रीय मेळाव्यात महाराष्ट्र राज्य डाळिंब बागायतदार संघाचे अध्यक्ष प्रभाकर चांदणे, कृषी विश्वविद्यालय धारवाडचे माजी कुलगुरू डॉ. विठ्ठल बेनागी, जिल्हाध्यक्ष कृषी अधिकारी सोलापूरचे शुक्राचार्य भोसले, कर्नाटक डाळिंब उत्पादक संघ बेंगलोरचे उपाध्यक्ष नागराज एस. एम. आदी मान्यवर सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी प्रगतशील डाळिंब उत्पादक शहाजीराव जाचक आणि प्रतापराव काटे यांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे.

याप्रसंगी देशभरातून ३५० हून अधिक डाळिंब उत्पादक शेतकरी उपस्थित राहून संवाद साधणार आहेत. या निमित्ताने डाळिंब शेतीत नाविन्यपूर्ण प्रगती साधणाऱ्या कर्नाटक, महाराष्ट्र, राजस्थान आणि गुजरात राज्यांतील शेतकऱ्यांना "राष्ट्रीय पातळीवर पहिल्यांदाच 'अनार गौरव पुरस्कार' देऊन प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित कंपन्यांचा सहभाग राहणार आहेत.

या मेळाव्यास डाळिंब उत्पादक शेतकरी, संशोधक व भागधारक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सोलापूर केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ धुमाळ यांनी केले आहे.

### असे आहे मेळाव्याचे स्वरूप

- या मेळाव्यात पहिल्या सत्रात डाळिंब संशोधन केंद्राच्या विविध माहिती पुस्तकांचे प्रदर्शन
- डाळिंब संशोधन केंद्रावरील चित्रफितीचे अनावरण होणार आहे. दुसऱ्या सत्रात डॉ. चंद्रकांत अवचारे यांचे उत्कृष्ट डाळिंब उत्पादन पद्धती,डॉ. सोमनाथ पोखरे यांचे डाळिंबातील सूत्र कृमी व्यवस्थापन- डॉ. सोमनाथ पोखरे, डॉ. मजुनाथा एन. यांचे डाळिंब पीक संरक्षण तसेच डॉ. नीलेश गायकवाड यांचे डाळिंबातील मूल्य संवर्धन या विषयावर चर्चासत्र होणार आहे, असे संचालक डॉ. राजीव मराठे यांनी सांगितले.

# हर्षवर्धनराजे व स्वामिनीराजे भोसले यांच्या हस्ते महापूजा संपन्न

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सव -२०२५ चे आयोजन करण्यात आले असून, सोमवारी श्री तुळजाभवानी माता मंदिरात महापूजा, आरती व घटस्थापना चि. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले यांच्या हस्ते संपन्न झाले. आई राजा उदो उदो...! सदानंदाचा उदो उदो...! च्या जय घोषाने परिसर दुमदुमून गेला होता.



न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, पुरोहित सोमकांत कुलकर्णी यांच्या मंत्र पठणाने महापूजा व घटस्थापना संपन्न झाली. आरती नंतर उपस्थिताना प्रसादाचे वाटप करण्यात आले. चि. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामिनीराजे अमोलराजे भोसले यांचा सत्कार न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आला.

या प्रसंगी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, मनोज निकम, रोहन शिर्के, सागर पवार, नामा भोसले, अप्पा हंचाटे, राजेंद्र काटकर, बाबुशा महिंद्रकर, स्वामिनाथ बाबर, सतीश महिंद्रकर, रमेश हेगडे, अनिल बिराजदार, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, तानाजी पाटील, राजू पवार, महांतेश स्वामी, सिद्धराम कल्याणी, बलभीम पवार, प्रकाश माने, धानप्पा उमदी, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी, विशाल घाटगे यांच्या सह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# शाळांना यंदा दिवाळीची १२ दिवस सुट्टी!

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** यंदाच्या शैक्षणिक वर्षात शाळांना रविवारसहित १२९ दिवस सुट्या आहेत. त्यात दिवाळीची सुटी १६ ते २७ ऑक्टोबरपर्यंत असणार आहे. चालू महिन्यात घटस्थापना (ता. २२) या दिवशी विद्यार्थ्यांना सुटी आहे. शालेय शिक्षण विभागाने २०२५-२६ च्या शैक्षणिक वर्षातील सार्वजनिक सुट्यांची यादी जाहीर केली आहे. त्यात ५३ रविवार आणि सण-उत्सव, महापुरूषांच्या जयंती अशा ७६ सुट्या आहेत. त्यात उन्हाळ्याच्या सुट्या देखील समाविष्ट आहेत. शैक्षणिक वर्षातील किमान २२० दिवस अध्यापनाचे कार्य व्हावे, असे अपेक्षित आहे. पण, उन्हाळा



सुट्यांपूर्वी बहुतेक शाळा पहिली ते नववीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची अंतिम सत्र परीक्षा एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात उरकत होत्या. त्यामुळे साधारणतः २० एप्रिल ते १४ जून अशी उन्हाळा सुटी असायची. पण, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने अंतिम सत्र परीक्षा ८ ते २५ एप्रिल या काळात घ्यावी, असे आदेश काढले आहेत. त्यामुळे अध्यापनाचे दिवस नियमानुसार पूर्ण होतील असा त्यामागील उद्देश आहे.

चालू शैक्षणिक वर्षात शाळांना ५३ रविवारसहित असणार ७६ सार्वजनिक सुट्या,यंदा दिवाळी सुटी १२ दिवसांची तर २ मेपासून १४ जूनपर्यंत विद्यार्थ्यांना उन्हाळा सुट्टी,८ ते २५ एप्रिल या कालावधीत पार पडणार अंतिम सत्र परीक्षा अन पॅट चाचणी, दिवाळी सुट्यांपूर्वी पार पडणार शाळांची पहिल्या सत्राची परीक्षा.

शाळांकडून प्रश्नपत्रिकांची तयारी अन सरावही दिवाळीपूर्वी होणाऱ्या प्रथम सत्र परीक्षेच्या दृष्टीने शाळांमध्ये सध्या सराव सुरू आहे. शिक्षकांकडून प्रत्येक विषयांच्या प्रश्नपत्रिका तयार करण्याचीही कार्यवाही सुरू आहे. यंदा पहिली ते नववीच्या अंतिम सत्र परीक्षा व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून होणारी 'पॅट' सोपी जाईल, अशा प्रश्नपत्रिका दिवाळीपूर्वीच्या परीक्षेत असणार आहेत.

**दिवाळी सुट्यानंतर २८ ऑक्टोबरपासून सुरू होतील शाळा**

दिवाळीपूर्वी सर्व शाळांची प्रथम सत्र (सहामाही) परीक्षा होईल. त्यानंतर १६ ऑक्टोबरपासून शाळांना दिवाळी सुटी असेल. २८ ऑक्टोबरपासून (मंगळवार) पुन्हा शाळा पूर्ववत सुरू होतील.

- **कादर शेख,** प्राथमिक शिक्षणाधिकारी, सोलापूर

# अतिवृष्टीमुळे पंढरपूर तालुक्यातील शेतकऱ्यांची पिके पाण्याखाली

## आ. समाधान आवताडे यांनी केली पाहणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यभरात परतीच्या मुसळधार पावसामुळे शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे.



गेल्या काही दिवसांपासून पंढरपूर-मंगळवेढा तालुक्यातील गावांमध्ये सततच्या होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे व फळबागांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. पंढरपूर तालुक्यातील बोहाळी उंबरगाव परिसरास रविवारी रात्री पावसाने झोडपून काढले. या परिसरातील ओढे, नाले ओसंडून वाहू लागले.

तरीही हजारो एकर पिकातून पाणी साठून राहिले. या परिस्थितीची पाहणी संवेदनशील व कर्तव्यदक्ष आ. समाधान आवताडे यांनी सोमवारी सकाळी केली. त्यांच्यासमवेत तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशील संसारे, महसूल आणि कृषी विभागाच्या अधिकारी सोबत होते.

पंढरपूर तालुक्यातील उंबरगाव, बोहाळी येथे भेट देऊन अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ऊस, डाळिंब, बोर, मका यासह इतर शेती पिकांची पाहणी केली. याप्रसंगी आ. समाधान आवताडे यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांशी संवाद साधून परिस्थिती जाणून घेतली.

आ. समाधान आवताडे यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या सर्व शेती पिके व फळबागांचे पंचनामे करून शासनाकडे अहवाल पाठवण्याच्या सूचना सोबत असलेल्या तहसीलदारांना केल्या.

आ. समाधान आवताडे यांच्या गाड्यांचा ताफा, जसा जसा पुढे जात होता, तसं तसे शेतकरी रस्त्यावर येऊन उभा राहत होते. शेत पिकांचे झालेले नुकसान दाखवत होते. ओढ्यातून पाणी ओव्हरफ्लो झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांमधून साठले होते. या सर्व परिस्थितीची पाहणी आ. समाधान अवताडे यांनी केली. उंबरगाव आणि बोहाळी येथील काही शेतकऱ्यांच्या घरामध्ये पाणी घुसले होते, याबाबत तहसीलदारांना पंचनामे करण्याचे आदेश दिले.

# अकलूज येथील प्रा. विजया खराडे यांना डॉक्टरेट प्रदान

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** अकलूज येथील सदाशिवराव माने विद्यालयातील जीवशास्त्र विषयाच्या शिक्षिका प्रा. विजया जयाप्पा खराडे यांना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, यांची डॉक्टरेट प्रदान करण्यात आली.



त्यांनी प्राणीशास्त्र या विषयात पीएचडी साठी जलजीवशास्त्र विषयातील, या संशोधनामध्ये तळ्यातील जलजीव, पाण्याचे भौतिक -रासानिक गुणधर्म आणि यांच्यातील ऋतुनुसार सहसंबंध याचे संशोधन केले आहे.माळशिरस तालुक्यामध्ये तळ्यातील पाणी हे जास्त कृषी क्षेत्रात व्यवसाय आणि घरगुती कामासाठी वापरले जाते. जलाशयाचे पर्यावरणीय संतुलन टिकवण्यासाठी आणि पाण्याच्या नैसर्गिक स्रोताचे सौंदर्य जपण्यासाठी संशोधन केले. सदर पीएच.डी साठी त्यांना मार्गदर्शन शंकरराव मोहिते महाविद्यालयातील डॉ. सुधा बनसोडे यांचे लाभले.

खराडे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंह मोहिते पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते पाटील, सचिव सहसचिव, शिक्षक शिक्षकेतर सेवक यांनी अभिनंदन केले.

# राजकारणात संयम महत्त्वाचा असतो - खा. मोहिते-पाटील

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** राजकारणात संयम महत्वाचा असतो, त्यात कुठे थांबायचे हे कळणारा माणूसच जीवनात यशस्वी होतो असे मत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.



अकलूज येथील उदय सभागृहात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, शिवरत्न इन्स्टिट्युट मॅनेजमेंट स्टडीज, ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर ॲण्ड टेक्नॉलॉजी व विजयसिंह मोहिते-पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आ. रणजितसिंह मोहिते-पाटील व खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास केंद्र पीएम उषा योजने अंतर्गत पाच दिवसांची कौशल्य विकास मार्गदर्शन व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या समारोप प्रसंगी राजकीय नेतृत्वामधील कौशल्याची संधी या विषयावर त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. प्रारंभी अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. केदारनाथ काळवणे व डॉ. राजेंद्र वडजे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी शिवरत्न शिक्षण संस्थेचे सचिव धर्मराज दगडे, संचालक श्रीकांत राऊत, नितीन बनकर, ईशितादेवी मोहिते-पाटील यांच्यासह सोलापूर व सातारा जिल्ह्यातील कार्यकर्ते उपस्थित होते. सूत्रसंचलन प्रा. भारत साठे यांनी केले तर आभार डॉ. विश्वनाथ आवड यांनी मानले.

# कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची प्रगतशील द्राक्ष व केळी बागेस भेट

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषी महाविद्यालयामधील विद्यार्थ्यांनी दीक्षारंभ कार्यक्रमांतर्गत नुकत्याच प्रथम वर्षामध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रगतशील बागायतदार मा. धनराज शिंदे यांच्या शेतावरती प्रत्यक्ष भेट देऊन द्राक्षांच्या विविध जातींची लागवड,केळी लागवड, पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था तन नियंत्रण, खत व्यवस्थापन, कीड व पीक व्यवस्थापन याबद्दल प्रगतशील शेतकरी श्री. नितीन (बापू) कापसे यांनी याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली भविष्यामध्ये कृषी मधील संधी फळबाग लागवडीचे फायदे याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या भेटीचे नियोजन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. बी.शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी प्रा. डॉ. संतोष शेंडे, डॉ. महेश गुरव प्रा. शितल शेळके कृषी सहाय्यक पूजा मोटे आधी उपस्थित होते.

